ePaper
आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्यावर रोड शोमध्ये दगडफेक



| वर्ष - 7 | अंक - 324 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 13 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- राजस्थानचा पंजाबवर विजय
- खासदार कार्यसम्राट हवाय की, नटसम्राट!
- मोदींचा मोर्चा ऑनलाईन गेमिंगकडे!
- नेपोटिझमवर विद्या बालनचं स्पष्ट विधान

## मुळा नदीवरील पुलाच्या कामाची मुदत संपली तरी काम सुरूच!

# मुळाच्या पुलाला मुदतवाढीचा पूर!

### » आता सजावटीसाठी 20 कोटींचा खर्च; निविदा काढल्याचा प्रशासनाचा दावा

**। पिंपरी । महाईन्यूज**

**महापालिकेच्या वतीने सांगवी ते बोपोडी या मुळा नदीवरील पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्यासाठी ४२ कोटींचा खर्च करण्यात आला असताना त्याच पुलासाठी २० कोटी रुपयांच्या खर्चाची नवी निविदा काढण्यात आली आहे. पुलावरील कमान, आकर्षक रचनेतील सजावटीसाठी निविदा काढल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. महापालिकेच्या वतीने सांगवी ते बोपोडी या मुळा नदीवरील पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्यासाठी ४२ कोटींचा खर्च करण्यात आला असताना त्याच पुलासाठी २० कोटी रुपयांच्या खर्चाची नवी निविदा काढण्यात आली आहे.**



पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरास जोडणाऱ्या सांगवीजवळील स्पायसर महाविद्यालय येथील अरुंद पुलामुळे वाहतुकीचा खोळंबा होत आहे. या एकपदरी पुलावार वारंवार वाहतूक कोंडी होते. त्यासाठी सांगवीतील दत्त आश्रम मठ ते बोपोडीतील चंद्रमणी नगर असा असा पूल उभारण्याचे काम हाती घेतले आहे. पूल ७६० मीटर लांबीचा असून दोन पदरी आहे. त्यांची रुंदी १८.६० मीटर आहे. सांगवीच्या बाजूने ८० मीटर आणि पुण्याच्या बाजूस ५५५ मीटरचा पोहोच रस्ता आहे. पुलासाठी ४१ कोटी ६३ लाख खर्चास स्थायी समितीने ११ सप्टेंबर २०२१ रोजी मंजुरी दिली होती. त्यातील निम्मा खर्च पुणे महापालिका देणार आहे. पुलाचे काम टी अँड टी कंपनी करीत आहे. कामाची मुदत दोन वर्षे होती. काम पूर्ण करून पूल वाहतुकीस जानेवारी २०२४ ला सुरू करण्याचे नियोजन होते. मात्र, पुण्याकडील कृषी महाविद्यालयाची जागा उपलब्ध होत नसल्याने हे काम रखडले होते. अखेर ती जागा उपलब्ध झाल्याने काम अंतिम टप्प्यात आले. हा पुल पावसाळ्यापूर्वी तयार होईल, असा दावा पालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे. काम पूर्णात्वाकडे असताना प्रशासनाने या पुलासाठी आणखी एक निविदा प्रसिद्ध केली आहे. स्थापत्य प्रकल्प विभागाने १९ कोटी ६३ लाख ५६ हजार ३९६ रुपये खर्चाची निविदा नुकतीच प्रसिद्ध केली आहे. पुलाची पूर्वी निविदा प्रसिद्ध झालेली असताना त्याच कामासाठी नव्याने निविदा राबवून खर्च केला जात असल्याबद्दल शंका उपस्थित केली जात आहे. सजावटीवर २० कोटींची उधळण केली जाणार असल्याचा आरोप होऊ लागला आहे.

### 19 कोटी 63 लाख खर्चाची नवीन निविदा

**» सांगवी-बोपोडी पुलावरील कमान, आकर्षक रचनेत सजावट आणि अनुषंगिक कामे करण्यात येणार आहेत. त्यासाठी १९ कोटी ६३ लाख खर्चाची नवीन निविदा काढली असल्याचे कार्यकारी**

## कॉर्पोरेशन' ऐवजी झाले 'कन्स्ट्रक्शन'!

### » पात्र ठेकेदाराचे नाव चुकविल्याने कामकाजात हलगर्जीपणा, महापालिकेचे उपलेखापालास दंड

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

पात्र ठेकेदाराचे नाव चुकविल्याने कामकाजात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत महापालिकेचे उपलेखापाल महेश निगडे यांना ५०० रुपये दंड केला आहे. तसेच त्यांच्याकडील स्थापत्य प्रकल्प विभागाची जबाबदारी काढून घेण्यात आली. ही कारवाई अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी केली.

महापालिकेचे उपलेखापाल निगडे यांनी केवळ नाव दुरुस्त करून पुन्हा स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली. कामकाजात निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवत उपलेखापाल




निगडे यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्यांना केलेला ५०० रुपये दंड वेतनातून वसूल करण्याचे आदेश दिले आहेत.

### जयंत पाटील यांच्याशी जवळीक...

**»मोशी येथील महापालिकेच्या ताब्यात असलेल्या गायरान जागेत ७०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय उभारण्यात येत आहे. या जागेस सीमा भिंत बांधण्यासाठी सिद्धनाथ कॉर्पोरेशन या ठेकेदाराची लघुत्तम निविदा प्राप्त झाली. स्थायी समितीच्या प्रस्तावात संबंधित ठेकेदाराचे नाव 'सिद्धनाथ कॉर्पोरेशन' ऐवजी 'सिद्धनाथ कन्स्ट्रक्शन' असे झाले होते.**

# खासदार कार्यसम्राट हवाय की, नटसम्राट!

## राष्ट्रवादीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अमोल कोल्हे यांना टोला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिरुर लोकसभेचे महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ हडपसर विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्त्वाखाली मेळावा पार पडला.या मेळाव्याला उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील,आमदार चेतन तुपे, माजी आमदार योगेश टिळेकर,शिवसेनेचे पुणे शहरप्रमुख नाना भानगिरे यांच्यासह आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.**




या मेळाव्यात अजित पवार म्हणाले की,मागील पाच वर्षापूर्वी ज्यांना तुम्ही (अमोल कोल्हे) निवडून दिले.त्यावेळी त्यांच्या (अमोल कोल्हे) सभांना अनेक ठिकाणी आलो आहे.परंतु पाच वर्षाच्या मध्येच डॉ अमोल कोल्हे मला म्हणायला लागले.दादा मला राजीनामा द्यायचा आहे.माझा काम खासदारच नाही.दादा मी सेलिब्रेटी असून मी सिनेमात काम करणारा नट आहे.मी अभिनेता,मालिकेत काम करणारा कलावंत आहे.त्यामुळे माझा मोठ नुकसान होत आहे.यामुळे मला राजीनामा द्यायचा आहे.मी त्यांच सर्व म्हणण ऐकून घेतल्यावर एकच म्हटले की,बाबा रे तुला लोकांनी पाच वर्षाकरीता निवडून दिले आहे.जरा कळ काढ,जरा कळ काढ,पाच वर्ष पूर्ण होऊ दे,पुन्हा नको उभा राहू बाबा, मी पुन्हा उभा रहा देखील म्हणणार नाही.पण आता पुन्हा त्यांना (अमोल कोल्हे) काय झाले आहे की,पुन्हा जोर आणि बैठका सुरु केल्या आहेत आणि आखाड्यात आल्याचे सांगत अजित पवार यांनी अमोल कोल्हे यांच्यावर निशाणा साधला.

तसेच ते पुढे म्हणाले की, त्यांनी (अमोल कोल्हे) किती संपर्क ठेवला,किती लोकांना उपलब्ध राहिले.हे येथील जनतेला माहिती आहे.त्यामुळे आता हवेली आणि शिरुर मतदार संघाला ठरवायच,तुम्हाला कार्यसम्राट खासदार पाहिजे की,नटसम्राट खासदार पाहिजे,अशा शरद पवार गटाचे विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांना टोला लगावला.

### मतदान कसे वाढेल याकडे अधिकाधिक लक्ष द्या

» तसेच ते पुढे म्हणाले की,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली मागील दहा वर्षात देश प्रगती पथावर जात आहे.या संपूर्ण दहा वर्षाच्या कालावधीत करण्यात आलेली विकास काम नागरिकापर्यंत पोहोचवा, आपले मतदान कसे वाढेल याकडे अधिकाधिक लक्ष द्या, पुणे शहर आणि जिल्ह्यातील महायुतीचे उमेदवार निवडून आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करा, असे आवाहन देखील त्यांनी उपस्थितांना यावेळी केले.

### नेमकं 'पोषण' कुणाचं?: अमोल कोल्हे

» पुण्यातील शिरूर तालुक्यातील आंबळे गावातून धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातून गरोदर महिलांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहारात अळ्या आणि सोनकिडे आढळून आले आहेत. या प्रकरणावरती आता राजकीय प्रतिक्रिया समोर येऊ लागल्या आहेत. शिरूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आणि विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांनी याबाबत प्रतिक्रिया देत सरकारवर हल्लाबोल केला आहे. आंबळे गावातील आरोग्य विभागात गरोदर असणाऱ्या महिलांना उत्तम प्रकारची शक्ती मिळावी, यासाठी शासनाचा पोषक आहार म्हणून किट देण्यात येतो. मात्र, या किटमध्ये बदाम, खारीक, काजू , गूळ आणि इतर पोषण आहाराचा समावेश आहे. या आहारातील गूळ आणि काजूमध्ये किडे आढळले आहेत. यामुळे आरोग्य विभागाकडून गरोदर मातेच्या आरोग्याशी खेळ होतोय का, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

### 'लोकांमधील खासदार हवाय की सेटवरचा?'; आढळराव पाटील यांचा तरुणांना प्रश्न

» कुंजीरवाडी येथे गावभेट दौऱ्यातील सभेत ते बोलत होते. ते म्हणाले, ज्यांनी पाच वर्षांत रुपयाचा निधी आणला नाही, ज्यांच्या बोलण्यात वास्तविकता नाही, अशा व्यक्तीला दूर करायची हीच संधी लोकसभेच्या निवडणूकीच्या निमित्ताने मतदार म्हणून तुम्हाला आहे. तुम्हाला स्टुडिओच्या सेटवरचा खासदार पाहिजे का लोकांमध्ये असणारा पाहिजे हे ठरवण्याची देखील हीच वेळ आहे. अशी साद महायुतीचे शिरूर लोकसभेचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी तरुण मतदारांनी दिली. देशाचे भवितव्य ठरविणारी ही महत्वाची निवडणूक आहे. या मतदारसंघातील केंद्राच्या निधीवर उभे राहणारे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी मोदींना पाठबळ द्यावे लागेल, त्यासाठी खासदार म्हणून पुन्हा एकदा मला पाठबळ द्या.

यावेळी भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे पाटील, पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, हवेली तालुका अध्यक्ष दिलीप नाना वल्हेकर, पीडीसीसी बँकेचे संचालक प्रदीप कंद, बाजार समिती सभापती दिलीप काळभोर, हवेली बाजार समितीचे संचालक राजाराम कांचन, शिवसेनेचे विपुल शितोळे, व्हीजेएनटी सेलचे हवेली तालुका अध्यक्ष दिलीप गाडेकर आदी यावेळी उपस्थित होते. या दौऱ्यादरम्यान आढळराव पाटील यांनी दादासाहेब तुपे, सचिन तुपे, सुमित तुपे यांच्या निवासस्थानी भेट दिल्या. गेल्या १५ वर्षात तुमच्या भागात आतापर्यंत कितीतरी वेळा या भागात मी आलो आहे. अनेक कामांसाठी खासदार निधी दिला आहे. त्यात रस्ते असतील अन्य प्रकल्प असतील त्यासाठी कायम तुमच्यासाठी कार्यरत राहिलो आहे. आता तर मतदारसंघातील मोठे प्रकल्प मार्गी लावायचे आहेत. त्यासाठी लोकसभेत जाण्यासाठी तुमचे पाठबळ हवे. असे मत शिरूर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी व्यक्त केले.

---

# "यशाचे 'शिखर' गाठण्यासाठी निसर्गप्रेमींची साथ उर्जा देणारी"

## मुरलीधर मोहोळांनी व्यक्त केल्या भावना; गिर्यारोहक, दुर्गप्रेमी, क्रीडापटूंचा स्नेहमेळावा

। पुणे । महाईन्यूज ।

ऐतिहासिक वारसा जतन करण्यात गिरीप्रेमी आणि दुर्गप्रेमींचे योगदान खुप महत्वपूर्ण आहे. गिर्यारोहक आणि सायकलपटूंचा उत्साह पाहून नक्कीच मला प्रेरणा मिळते. पण या मेळाव्यात येऊन निसर्ग संपन्न पुण्याची नव्याने ओळख मला या निसर्गप्रेमींकडून झाली असल्याची भावना महायुतीचे पुण्यातील उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केली. सिंहगड परिवार फाउंडेशन, नरवीर पिलाजीराव गोळे प्रतिष्ठान, गरुडझेप आणि झेप गिर्यारोहण संस्था अशा संस्थांच्या संयुक्त विद्यमाने गिर्यारोहक, गिरीप्रेमी, दुर्गप्रेमी, सायकलपटू, क्रीडापटूंच्या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात मोहोळ बोलत होते.



पुढे बोलतांना ते म्हणाले की, या मेळाव्या ज्या अपेक्षा व्यक्त केल्या गेल्या आहेत त्या सर्व पूर्ण करण्यासाठी मला तुम्ही सगळे साथ द्या. कारण इथे येऊन निसर्वप्रमींची जी साथ मला मिळाली आहे. ती मला यशाचे शिखर गाठण्यासाठी उर्जा देणारी असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. यावेळी गिरीप्रेमी संस्थेचे अध्यक्ष उमेशजी झिरपे, ज्येष्ठ गिर्यारोहक सुनिताताई नाडगीर, पाच ग्रिनीज रेकॉर्ड होल्डर प्रीती मस्के, निरूमा भावे, डॉ नंदकिशोर मते, सुरेंद्र दुग्गड, लहु उघडे, हर्षल राव, मोहन ओगले, विकास करवंदे, नारायण बतुल, प्रकाश केदारी, सौरभ करडे, मारुती आबा गोळे यांच्यासह सर्व गिरीप्रेमी, दुर्गप्रेमी, सायकलपटू आणि क्रीडापटू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या जोखमीच्या क्षेत्रात वावरतांना अनेक बांधवांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्या या सगळ्या धाडसीवीरांना मोहोळ यांनी श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी खेळाडूंच्यावतीने पुणे शहर हे निसर्गाशी जवळीक साधणारे शहर असून येथे गेल्या काही वर्षात साहसी खेळांची आवड तरूणांच्यात वाढत आहे. पुणे हे सह्याद्रीच्या कुशीत असल्याने येथे साहसी खेळांच्या सुविधा वाढवल्या तर त्याचा फायदा निसर्ग पर्यटनाला होऊ शकतो. दुर्गप्रेमींनी राज्यातील सर्व किल्ल्यांवर प्लास्टिक वापराला बंदी घालावी, अशी मागणी करण्यात आली.

### साहसी खेळांना प्रोत्साहन देणार

**»मोहोळ म्हणाले, 'मी स्वत: खेळाडू असल्याने खेळामुळे मानसिक आणि शारिरीक जडणघडण कशी होते?, ते मी अनुभवलं आहे. आता आमच्यावेळच्या खेळात साहसी खेळांचीही भर पडली आहे. इथे सह्याद्रीपासून एव्हरेस्टपर्यंत झेप घेणारे अनेकजण मला दिसत आहेत. यापुढे साहसी खेळांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी माझी असेल याबद्दल विश्वास बाळगा'.**

## तीन महिन्यांपासून महापालिकेची

# हवा प्रदूषण यंत्रणा धूळखात!

### दिल्लीच्या धर्तीवर महापालिकेच्यावतीने हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविली

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाढते शहरीकरण आणि औद्योगिकरणामुळे हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस ढासळत चालल्याने हवा शुद्ध होण्यासाठी महापालिकेने शहराच्या विविध भागात हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा (एअर बिन प्युरिफायर) बसविली आहे. मात्र, तीन महिने झाले तरी ही यंत्रणा अद्याप सुरु झाली नसून ती धूळखात पडून आहे.**

महापालिकेच्या वतीने पिंपरी चौकात शहरातील हवेची गुणवत्ता दर्शविण्यासाठी कृत्रिम फुफ्फुसे बसविली होती. ती महिनाभरातच काळी पडल्याने शहराची गुणवत्ता ढासळत असल्याचे सिद्ध झाले. त्यामुळे दिल्लीच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविली आहे. राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमाअंतर्गत (एनसीएपी) शहरातील १७ चौकात हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात आली आहे. दर दहा मिनिटांनी या यंत्रणेद्वारे पाण्याचे तुषार उडविले जाणार आहेत. त्यामुळे हवेतील धुळीकण जड होऊन खाली बसतील. वर्दळीच्या चौकात आकर्षक रचनेतील यंत्रणा बसविण्यात आली आहे. पाणीपुरवठा करण्यासाठी त्याखाली ५०० ते एक हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे. या कामासाठी तीन कोटी ९० लाखांचा खर्च झाला आहे.

आणखी वाचा-पिंपरी : मुळा नदीवरील पुलाच्या कामाची मुदत संपली तरी काम सुरूच! आता सजावटीसाठी २० कोटींचा खर्च

पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, भोसरी, नाशिक फाटा, चिंचवड स्टेशन, कस्पटे वस्ती, होळकर



चौक, नेहरूनगर चौक, मोशी गोडाऊन चौक, चिंचवड येथे हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, आकुर्डी खंडोबा चौक, नाशिक फाटा, नेहरूनगर चौक, चिखली आरटीओ चौक, चिंचवडगाव चौक, रावेत-भोंडवे चौक, कोकणे चौक, तळवडे चौक, एमएए स्कूल चौक या चौकात 'मिस्ट फाऊंटन' बसविण्यात आले आहेत. त्याला तीन महिन्यांचा कालावधी लोटला आहे. तरी, अद्याप ते सुरू झालेले नाहीत. हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. चाचणी सुरू असून, ते लवकरच सुरू करण्याचे नियोजन असल्याचे पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांनी सांगितले.

#### अशी होती हवा प्रदूषक नियंत्रण यंत्रणा

वाढते शहरीकरण आणि औद्योगिकरणामुळे हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस ढासळत चालल्याने हवा शुद्ध होण्यासाठी महापालिकेच्या पर्यावरण विभागाने पुढाकार घेतला आहे. शहराच्या विविध भागांत हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा (एअर बिन प्युरिफायर) बसविण्यात येणार आहे. त्यानुसार वाकडमधील कस्पटे वस्तीमध्ये प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविली आहे. महापालिकेच्या वतीने पिंपरी चौकात ११ जानेवारी २०२३ शहरातील हवेची गुणवत्ता दर्शविण्यासाठी कृत्रिम फुफ्फुसे बसविली होती. ती महिनाभरातच काळी पडली होती. त्यातून शहराची गुणवत्ता किती ढासळत आहे, हे सिद्ध झाले होते. हवेमध्ये प्रदूषक कणांची पातळी वाढली. त्यामुळे सर्दी, खोकला, दम लागणे आदींमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. शहरात वाहनांची प्रचंड संख्या वाढली आहे. त्यातून बारीक कण हवेत मिसळत आहेत. तसेच बांधकाम क्षेत्रातील धुळही वाढत आहे. परिणामी, सध्या प्रदूषित हवेचा श्वास नागरिक घेत आहेत. त्यामुळे महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या वतीने शहरातील महत्त्वाच्या चौकात हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात येणार आहे. त्यानुसार वाकडमधील कस्पटे वस्तीमध्ये यंत्रणा बसविली असून लवकरच कार्यान्वित करण्यात येणार आहे.

---

# नवजात बालकांची तस्करी करणारी महिलांची टोळी गजाआड!

### सहा महिलांना वाकड पोलिसांकडून अटक; 16 एप्रिल पर्यंत न्यायालयीन कोठडी

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवडमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. नवजात बालकांची तस्करी करणाऱ्या टोळीचा वाकड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी सहा महिलांना वाकड पोलिसांनी अटक केली असून त्यांना १६ एप्रिल पर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. सहा आरोपी महिलांमध्ये एक परिचारिका असून ती मुख्य सूत्रधार असल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी- चिंचवड शहरातील वाकड परिसरात नवजात बालकांची तस्करी करणारी टोळी सक्रिय असल्याची माहिती वाकड पोलिसांना मिळाली होती. काही महिला जगताप डेअरी या ठिकाणी नवजात बालक विकण्यासाठी येणार असल्याची माहिती वाकड पोलिसांना मिळाली. त्या ठिकाणी सापळा रचला.

१२ एप्रिल रोजी दुपारी सव्वाचार च्या सुमारास दोन रिक्षातून सहा महिला उतरल्या, त्यांच्याकडे सात दिवसांचं नवजात बालक होतं. संशय बळावल्याने महिलांना वाकड पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलं. पोलिसांनी नवजात बालका विषयी विचारपूस केल्यानंतर महिलांना समाधानकारक उत्तर देता आलं नाही. वाकड पोलिसांनी सहा महिलांना पोलीस ठाण्यात नेऊन त्यांच्याकडे अधिक चौकशी केली.

आरोपी महिला अवघ्या सात दिवसांच नवजात बालक विकण्यासाठी आल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं. धक्कादायक बाब म्हणजे याआधी देखील या महिला आरोपींनी पाच नवजात बालक विकल्याचं पोलीस चौकशीत उघड झाल आहे. महिला आरोपींमध्ये एक परिचारिका असून ती खाजगी रुग्णालयात काम करते. आर्थिक परिस्थिती नाजूक असलेल्या पालकांना हेरून परिचारिका त्यांना पैशाचं अमिश दाखवून नवजात बालक विकत घ्यायची. तेच बालक तिच्या टोळीच्या मदतीने इतर मुल-बाळ नसलेल्या पालकांना विकून त्यांच्याकडून पाच ते सात लाख रुपये घ्यायची. अखेर बालकांची तस्करी करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे.

#### पाच नवजात बालकांची विक्री केल्याचे कबूल


महत्वाचे म्हणजे, म्हणजे याआधी आरोपी महिलांनी पाच नवजात बालकांची विक्री केल्याचे कबूल केले. सर्व आरोपी महिलांमध्ये एक महिला ही परिचारिका असून ती एका खाजगी रुग्णालयात काम करते. आर्थिक परिस्थिती बेताची असणाऱ्या पालकांना हेरून त्यांना पैशाचं अमिश दाखवून नवजात बालक विकत घेऊन या बाळकांची विक्री ज्यांना मुले नाहीत अशा पालकांना मोठ्या रकमेळा ही टोळी विक्री करत होते. ६ ते ७ लाख रपयांना बाळाची विक्री केली जात असे. या टोळिमागे आणखी कुणाचा हात आहे का? त्या दृष्टीने पोलिस तपास करत आहेत.



भूमिका

**प्रभाकर बरवे यांनी कागदावरल्या एका चित्रात राजाबाई टॉवर रेखाटला- रंगवला आहे, ते चित्र एका लिलावसंस्थेच्या संकेतस्थळावर आहे. पण हे चित्र फारच अपवादात्मक. एरवी बरवे यांच्या चित्रांमध्ये अशा प्रसिद्ध इमारती नसायच्या. म्हणजे, बरवेंच्या चित्रांत कधी कधी इमारती असायच्या- त्या मुंबईतल्याही असायच्या; पण या इमारती आपल्या सर्वांच्या रोजच्या पाहण्यात असतात तशा साध्याच असायच्या.**

# वास्तुरचना, वारसा आणि वास्तव!



उंच इमारतींचे तपशील रंगवणं बरवे पूर्णच टाळायचे – पण एकमजली, दुमजली कौलारू इमारतींचे जिने, कठडे, दारं हे सारं अगदी तपशीलवार नोंद केल्यासारखं असायचं. बरवे यांच्या एका चित्रात अशीच एक दुमजली इमारत दिसते आणि बरवेंना ओळखणारे लोक म्हणतात, 'त्यांनी गिरगावातल्या छोट्या खोलीत घेतलेला स्टुडिओ याच इमारतीत होता!' सुधीर पटवर्धनांच्या चित्रांमध्येही इमारती आहेत. मुंबईच्या किंवा आसपासच्या उपनगरांतल्या इमारती, गेल्या दशकभरातल्या 'अनदर डे इन ओल्ड सिटी'सारख्या चित्रांमध्ये तर पुण्याच्याही इमारती. पण त्यांच्या चित्रांमध्ये थेट इमारती येण्याच्याही आधीपासून वास्तुरचनेचे तपशील होते. हे तपशील सार्वजनिक जागांवरचे होते. उदाहरणार्थ, पटवर्धनांच्या ज्या चित्राची छापील आवृत्ती 'राष्ट्रीय आधुनिक कला संग्रहालया'त सहज मिळते, त्या 'ट्रेन' या चित्रात दादर स्टेशनवरच दिसणाऱ्या पुलाचा कठडा आहे. तो अत्यंत विशिष्ट असा तपशील आहे. पण एकेका इमारतीपेक्षा शहररचनेकडे पटवर्धनांनी पाहिलं. त्यातून एकाच चित्रचौकटीत निरनिराळ्या प्रकारच्या इमारती आल्या. झोपडय़ा- चाळी- उंच इमारती असा भेद किंवा चकचकीत नव्या, रंगीबेरंगी, डिझायनर आकारांच्या इमारतींबरोबरच किमान ५० वर्षं जुन्या, काळाला तोंड देत टिकलेल्या इमारती यांमधला ताणही त्यांनी चित्रांमध्ये आणला. 'लोअर परळ'सारख्या चित्रात, आता पाडून टाकण्यात आलेला तो पूलही (आता) अजरामर झाला. या दोघा महाराष्ट्रीय ज्येष्ठ चित्रकारांनी आपापल्या कलाविषयक भूमिकांमधून आपल्या आसपासच्या 'साध्या' इमारती चितारल्या, हे इथं आपल्यासाठी महत्त्वाचं. बरवेंच्या चित्रांमधल्या इमारती या बरवे यांची दृश्यनिर्मिती असतात. नितीन कुलकर्णीसारखे बरवे यांना जवळून पाहिलेले अभ्यासक कदाचित सांगतील- फळाचा फळपणा, कबुतराचा पक्षीपणा जसा बरवे यांना चित्रांमध्ये आणायचा होता तसाच इमारतीचा इमारतपणा त्यांनी चित्रात आणला. पटवर्धनांच्या चित्रांमध्ये शहर, माणसं, इमारती यांचं नातं दिसतं. इथं बरवे आणि पटवर्धनांची तुलना करण्याचा प्रश्नच येत नाही, तसा हेतूही नाही. उलट, या दोघांच्या चित्रांमधल्या इमारतींना एकंदर चित्रविचाराचे संदर्भ होते, हे लक्षात ठेवण्यासारखं आहे. याउलट, चित्रविचाराचे असे संदर्भ अजिबात नसूनही साध्या वास्तुरचनांचं दृश्यांकन आधुनिक/ समकालीन कलेत झालेलं आहे. हे काम 'डॉक्युमेण्टरी मोड' किंवा 'दस्तावेजीकरण शैली'चा भाग मानलं जातं. आकाराच्या इंधनटाक्या, शीतकरण संयंत्र किंवा तत्सम हेतूसाठी औद्योगिक प्रकल्पांमध्ये आढळणारी बांधकामं, किंवा- 'जर्मनीतल्या सीगेन प्रांतामधील खाण-कामगारांची घरे' यांसारख्या बांधीव रचनांचे फोटो त्यांनी टिपले. एखाद्या प्रकारच्या बांधकामातल्या विविध तऱ्हा दाखवणारे सहा, नऊ किंवा १५ फोटो एकाच फ्रेममध्ये मांडून प्रदर्शित करायचे, अशी पद्धतही त्यांनी पाळली. 'टायपॉलॉजी' किंवा विधाविचार करणारं हे काम आहे, असा निर्वाळा समीक्षकांनी दिला. अमुक एखाद्या प्रदेशातच दिसणारे औद्योगिक उभारण्यांचे किंवा काही वेळा वास्तु-रचनांचे प्रकार त्यांनी टिपले. अनोळखी लोकांचे एकाच ठरावीक पद्धतीनं पासपोर्ट फोटो पाहिल्यासारखं वाटू शकतं प्रेक्षकांना, हे बेचर दाम्पत्याचं काम पाहताना. पण त्यातून जे साध्य झालं, ते आणखी निराळं होतं. भोवतालातलं 'साधं वास्तव' आपण टिपायचं आहे- या वास्तवदर्शनात प्रत्यक्ष मानवाकृती नसल्या तरी, ते मानवनिर्मित आणि माणसांसाठी उभारलं गेलेलं काहीतरी आहे. त्या उभारणीत ज्या काही तऱ्हा दिसतात त्यासुद्धा प्रयोगशीलता/ रूढीप्रियता, सौंदर्यनिर्मितीची आस/ कामचलाऊपणा अशा दोन टोकांच्या मोजपट्ट्यांवरल्या विविध बिंदूंवर असतील. हे वैविध्य टिपणं महत्त्वाचं आहे, असा दृश्यकलावंतांचा विश्वास या बेचर दाम्पत्यानं पुढे नेला. त्यातून फोटोग्राफीत तरी बेचर यांच्यानंतर एका शैलीची वाट रुंद होत गेली.

## संपादकीय »

### सियाचीनचा सांगावा..

***परवेझ मुशर्रफ यांनी कालांतराने ज्या घटनेचे वर्णन 'आम्हाला त्यांनी चकवा दिलाच' या शब्दांमध्ये केले; त्या भारताच्या यशस्वी मोहिमेचा आज ४० वा वर्धापन दिन..***

भारताने कोणता भूभाग गमावला किंवा जिंकला हा विषय राजकीय मुद्दा बनवण्याची प्रवृत्ती आजची नव्हे. परंतु विद्यामान राजकीय संस्कृतीमध्ये यास अधिक धार आणि काही वेळा विखार प्राप्त झाला आहे हे मात्र नक्की. आतापर्यंत सर्वाधिक काळ राज्य केलेल्या काँग्रेसच्या नेत्यांवर तर, भूभाग किती वेळा गमावले हे ऐकून घेण्याची वेळच अधिकदा येते. या साठमारीत काँग्रेसच्याच अमदानीत एक विलक्षण मोहीम फत्ते झाली याविषयी पाठ थोपटून घेण्याची संधी साधण्याची राजकीय कल्पकता किंवा इच्छाशक्ती या पक्षाच्या सध्याच्या नेत्यांमध्ये अजिबात दिसून येत नाही. अन्यथा आज, १३ एप्रिल रोजी ४० वर्षे होत असलेल्या 'ऑपरेशन मेघदूत' या सियाचीन दिग्विजय मोहिमेचे श्रेय राजकीय स्वार्थासाठी तरी घेण्याचा विचार झाला असता.

महात्मा ज्योतिबा फुले यांचा ११ एप्रिल, तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १४ एप्रिल हा जन्मदिन. महात्मा फुले यांना डॉ.आंबेडकर आपले गुरू मानत होते. महात्मा फुले १८२३ साली जन्मले तर डॉ.आंबेडकर १८९१ मध्ये. त्यांच्यात तब्बल ६६ वर्षांचे अंतर होते.

# फुले-आंबेडकरांचा जाती-अंत विचार



फुले कालवश झाले तेव्हा बाबासाहेब तीन वर्षांचे होते. या दोन्ही महामानवांच्या विचारांची झेप फार मोठी होती. समाज परिवर्तन का आणि कशासाठी करायचे याबाबतच्या त्यांच्या भूमिका पक्क्या होत्या. आज समाजामध्ये जातजाणिवा पातळ होण्याऐवजी बळकट होताना दिसत आहेत. जाती व धर्माच्या प्रश्नांना जगण्याच्या प्रश्नांपेक्षा महत्त्वाचे ठरवत त्यावर आधारित राजकारण केले जात आहे. हे आमच्या पुरोगामीपणाचे खचितच लक्षण नाही. म्हणूनच या दोन महामानवांनी जातीअंता बाबतची जी भूमिका मांडलेली आहे ती ध्यानात घेणे आणि तिचा अंगिकार करणे ही काळाची गरज आहे. या महामानवांचे जन्मदिन साजरे करत असताना तीच त्यांना खरी आदरांजली ठरू शकेल. इंग्रजी सत्ता, दारिद्र्य, रोगराई, दुष्काळ, सावकारी फास, गुलामगिरी, शेतकऱ्यांची होरपळ आदी कारणांनी पिचत चाललेल्या समाजाला महात्मा फुले यांनी सर्वप्रथम शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचा कृतिशील प्रयत्न केला. शिक्षणापासून ते लेखनापर्यंतच्या आणि स्त्री मुक्तिपासून ते सत्यशोधक समाजापर्यंतच्या अनेक क्षेत्रात फुल्यांनी उत्तुंग कामगिरी केली. आज राजकारणापासून कलेपर्यंतची सर्व क्षेत्रे आज जात्यंध व धर्मांध विचारांनी प्रदूषित केली जात, आपण जातीअंतासाठी त्यांनी केलेल्या कामाचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे.महात्मा फुले यांनी हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरीती विरोधात आवाज उठवला. जातिव्यवस्थेवर प्रहार केला. त्यांनी पुनर्विवाहाला दिलेल्या प्रोत्साहनापासून विधवांच्या संततीच्या बालकाश्रमापर्यंतचे केलेले उपक्रम ही जातीअंतासाठीची महत्त्वाची पावले मानावी लागतील. तुकाराम तात्या पडवळ यांच्या 'जातिभेद विवेकसार' या पुस्तकाची महात्मा फुल्यांनी दुसरी आवृत्ती स्वतः काढली होती. 'मी कोणत्याही व्यक्तीच्या हातचे अन्न ग्रहण करेन' असे म्हणणाऱ्या व तसे वागणाऱ्या महात्मा फुल्यांनी अस्पृश्यांसाठी स्वतःच्या वापरातील पाण्याचा हौद खुला केला होता. विधवांच्या केशवपन विरोधी यांनी आवाज उठवला होता. तसेच वैचारिक दास्यातून समाजाची सोडवणूक व्हावी म्हणून 'गुलामगिरी' सारखा ग्रंथ त्यांनी लिहिला. तसेच समतेचा विचार देणाऱ्या सत्यशोधक समाजाची भूमिका त्यांनी मांडली.परंतु कोणताही धर्म अथवा धर्म ग्रंथ ईश्वराने निर्माण केला नाही. इथला जातीभेद, वर्णव्यवस्था ही तर माणसाने स्वार्थी हेतूने निर्माण केली आहे, असे त्यांचे प्रतिपादन होते.'सार्वजनिक सत्यधर्म' हे पुस्तक फुले यांच्या निधनानंतर प्रकाशित झाले. त्यात त्यांची मूलगामी तत्वधारा दिसते. ख्यातनाम चरित्रकार धनंजय कीर यांनी या पुस्तकाला 'विश्व कुटुंबवादाची गाथा' म्हटले आहे. सर्व प्रकारची विषमता ही मानव निर्मित आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# विशाल पाटलांना वंचितचा पाठिंबा

## सांगलीचं गणित बिघडणार? प्रकाश आंबेडकर मैदानात

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महाविकास आघाडीत सांगली लोकसभेच्या जागेवरून मतभेद असल्याचं बोललं जात होतं. मात्र, तीन दिवसांपूर्वी मुंबईत महाविकास आघाडीच्या नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन त्यांच्यात कुठलेही मतभेद नसल्याचं स्पष्ट केलं. मविआ नेत्यांनी यावेळी तिन्ही पक्षांना महाराष्ट्रातील जागावाटपात कोणत्या जागा मिळाल्या आहेत याची यादीदेखील जाहीर केली. या यादीद्वारे सांगलीची जागा ठाकरे गटाला मिळाली आल्याचं स्पष्ट करण्यात आलं.**



सांगलीतून लोकसभेचं तिकीट मिळावं यासाठी महाराष्ट्राचे माजी दिवंगत मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे नातू आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष विशाल पाटील प्रयत्न करत होते. त्यांना सांगलीतल्या इतर काँग्रेस नेत्यांचा पाठिंबाही आहे. पलूस-कडेगावचे आमदार विश्वजीत कदम हेदेखील पाटलांच्या समर्थनात मैदानात उतरले होते. कदम आणि पाटलांनी दोन वेळा दिल्लीवारी करून काँग्रेस पक्षश्रेष्ठींची भेटही घेतली होती. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि के. सी. वेणुगोपाल यांच्या भेटीनंतरही विशाल पाटलांना सांगलीतून तिकीट मिळालं नाही. काँग्रेस नेतृत्वाने सांगलीची जागा ठाकरे गटाला सोडल्यामुळे सांगलीतील स्थानिक काँग्रेस कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नेते कोणता निर्णय घेणार? याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे. विशाल पाटील अपक्ष लढण्याच्या विचारांत असल्याचीदेखील चर्चा रंगत आहे.शिवसेनेच्या ठाकरे गटाने डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटलांना सांगलीतून लोकसभेची उमेदवारी दिली आहे. स्वतः ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सांगलीत जाऊन चंद्रहार पाटलांसाठी प्रचारसभादेखील घेतली.ठाकरे गटातील राज्यसभेचे खासदार संजय राऊत तीन दिवस सांगलीत तळ ठोकून बसले होते. राऊतांनी या तीन दिवसांत सांगलीत ठाकरे गटाची मोट बांधली. स्थानिक नेत्यांच्या आणि मित्रपक्षांमधील नेत्यांच्या भेटीगाठी घेतल्या. चंद्रहार पाटील सांगलीत प्रचार करू लागले आहेत. तर, विशाल पाटील अजूनही लोकसभेचं तिकीट मिळावं यासाठी प्रयत्न करत आहेत. मात्र काँग्रेसने तिकीट नाकारल्यानंतर विशाल पाटील आता अपक्ष लढण्याच्या विचारांत असल्याची चर्चा आहेत.दरम्यान, सांगलीच्या मैदानात वंचित बहुजन आघाडी उतरली आहे. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी सांगलीत विशाल पाटलांना पाठिंबा जाहीर केला आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले विशाल पाटील सांगलीतून अपक्ष लढले तर आम्ही त्यांना पाठिंबा देऊ आणि निवडूनही आणू, प्रकाश आंबेडकर यांनी स्वतः ट्वीट करून याबाबतच माहिती दिली आहे.प्रकाश आंबेडकर म्हणाले, चार दिवसांपूर्वी प्रतीक पाटील (विशाल पाटील यांचे मोठे बंधू आणि वसंतदादा पाटील यांचे थोरले नातू) येऊन भेटून गेले.

### लोकसभेच्या जागेवरून मतभेद

» त्यांनी मला विचारलं की सांगली लोकसभेचं काय करायचं? मी त्यांना म्हटलं तुमच्यात हिंमत असेल तर निवडणूक लढा. तुम्ही लढलात तर आम्ही तुम्हाला पाठिंबा देऊ. आता आम्हाला बघायचंय की त्यांच्यात हिंमत आहे की नाही. ते (प्रतीक पाटील किंवा विशाल पाटील) लढले तर आम्ही त्यांना पाठिंबा देऊ आणि निवडूनही आणू, असा आम्ही त्यांना शब्द दिलाय.महाविकास आघाडीत सांगली लोकसभेच्या जागेवरून मतभेद असल्याचं बोललं जात होतं. मात्र, तीन दिवसांपूर्वी मुंबईत महाविकास आघाडीच्या नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन त्यांच्यात कुठलेही मतभेद नसल्याचं स्पष्ट केलं. मविआ नेत्यांनी यावेळी तिन्ही पक्षांना महाराष्ट्रातील जागावाटपात कोणत्या जागा मिळाल्या आहेत याची यादीदेखील जाहीर केली. या यादीद्वारे सांगलीची जागा ठाकरे गटाला मिळाली आल्याचं स्पष्ट करण्यात आलं.सांगलीतून लोकसभेचं तिकीट मिळावं यासाठी महाराष्ट्राचे माजी दिवंगत मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे नातू आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष विशाल पाटील प्रयत्न करत होते.

# किशोरी पेडणेकरांची राज ठाकरेंवर टीका

## राज ठाकरेंची तुलना दात पडलेल्या आणि नखं नसलेल्या वाघाशी केली

। नागपूर । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यात राज ठाकरेंनी नरेंद्र मोदी आणि महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला. या निर्णयाचे पडसाद अजूनही उमटताना दिसत आहेत. संजय राऊत यांनी राज ठाकरेंचा पक्ष नवनिर्माणचा नमोनिर्माण कसा झाला असा खोचक प्रश्न विचारला आहे.**



तर किशोरी पेडणेकरांनी राज ठाकरेंची तुलना दात पडलेल्या आणि नखं नसलेल्या वाघाशी केली आहे.राज ठाकरेंनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला आणि ती भूमिका जाहीर केली. त्यानंतर पत्रकार परिषद घ्यायची काय गरज होती. राज ठाकरे म्हणतात इतर पक्ष भूमिका बदलू शकतात मग आम्ही का बदलू नये? पण राज ठाकरे पक्ष स्थापन झाल्यापासून सातत्याने भूमिका बदलत आहेत. २०१९ मध्ये त्यांनी उच्चारलेली लाव रे तो व्हिडीओ ही टॅगलाईन चांगलीच प्रसिद्ध झाली. पण आता राज ठाकरेंनी भूमिका बदलली. आधी निळा, हिरवा आणि भगवा रंग असलेला झेंडा त्यांनी निवडला होता. आता भगवा रंग असलेला झेंडा राज ठाकरेंनी निवडला. असंही किशोरी पेडणेकर म्हणाल्या. लोकांना दात पडलेला, नखं नसलेला, शक्तीहीन झालेला आणि तोंडाने हवा मारणारा वाघ नको आहे. अशी बोचरी टीका किशोरी पेडणेकर यांनी केली आहे. आता किशोरी पेडणेकर यांच्या टीकेला राज ठाकरे काही उत्तर देतील का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

राज ठाकरेंनी आज पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी पुन्हा एकदा आपण मोदींना पाठिंबा का दिला ते सांगितलं. मोदी नसते तर राम मंदिर उभंच राहिलं नसतं, तसंच ३७० कलम हटलं नसतं असं राज ठाकरे म्हणाले आहेत. तसंच ज्यांना कावीळ असते त्यांना जग पिवळं दिसतं असं म्हटलं होतं. आता त्यांना किशोरी पेडणेकर यांनी दात नसलेला वाघ म्हणत टीका केली आहे.

### तोंडाने हवा मारणारा वाघ नको

» तर किशोरी पेडणेकरांनी राज ठाकरेंची तुलना दात पडलेल्या आणि नखं नसलेल्या वाघाशी केली आहे.राज ठाकरेंनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला आणि ती भूमिका जाहीर केली. त्यानंतर पत्रकार परिषद घ्यायची काय गरज होती. राज ठाकरे म्हणतात इतर पक्ष भूमिका बदलू शकतात मग आम्ही का बदलू नये? पण राज ठाकरे पक्ष स्थापन झाल्यापासून सातत्याने भूमिका बदलत आहेत. २०१९ मध्ये त्यांनी उच्चारलेली लाव रे तो व्हिडीओ ही टॅगलाईन चांगलीच प्रसिद्ध झाली. पण आता राज ठाकरेंनी भूमिका बदलली.आधी निळा, हिरवा आणि भगवा रंग असलेला झेंडा त्यांनी निवडला होता. आता भगवा रंग असलेला झेंडा राज ठाकरेंनी निवडला. असंही किशोरी पेडणेकर म्हणाल्या.लोकांना दात पडलेला, नखं नसलेला, शक्तीहीन झालेला आणि तोंडाने हवा मारणारा वाघ नको आहे. अशी बोचरी टीका किशोरी पेडणेकर यांनी केली आहे.

# मोदींचा मोर्चा ऑनलाईन गेमिंगकडे!

## इन्फ्लुअन्सर्सची भेट घेऊन नरेंद्र मोदींनी केली चर्चा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या लोकांशी चर्चा करत आहेत. तसंच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील काही गेमिंग इन्फ्लुअन्सर्सची भेट घेतली आहे. गेल्या काही वर्षांत गेमिंग क्षेत्रातील या इन्फ्लुअन्सर्सनाही चांगली मान्यता मिळाली आहे. त्यांचेही फॉलोवर्स मिलिअन्सच्या घरात असल्याने त्यांच्या समस्या सोडवण्याकडे भारतीय जनता पक्षाने आता भर दिला आहे.**

गेमिंग इन्फ्लुअन्सर्सची भेट घेतल्याचा व्हीडिओ प्रसिद्ध झाला आहे. गेमिंग क्षेत्रातील इन्फ्लुअन्सर्स आणि ई-स्पोर्ट्स एथलिट्सबरोबर मोदींनी गेमिंग क्षेत्राविषयी चर्चा केली. नमन माथुर, अनिमेश अग्रवाल, मिथिलेश पाटणकर, पायल धारे, अंशु बिष्ट, तीर्थ मेहता आणि गणेश गंगाधर या इन्फ्लुअन्सरसोबत मोदींनी चर्चा केली.या कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंतप्रधानांनी गेमिंग इन्फ्लुअन्सर्सबरोबर त्यांचा परिचय करून घेतला. या क्षेत्राला प्रोफेशनचा दर्जा दिला जावा का, त्यासाठी काय करता येईल, यावर या भेटीत चर्चा झाली. या क्षेत्रात तुम्ही दोन पद्धतीने तुमचं करिअर घडवू शकता, असं यावेळी इन्फ्लुअन्सर्सने मोदींना सांगितलं. या क्षेत्रात तुम्ही ई-स्पोर्ट्स बनू शकता किंवा गेमिंग कंटेट क्रिएटर म्हणून तुम्ही तुमची ओळख बनवू शकता, असंही त्यांनी पुढे स्पष्ट केलं. याशिवाय या क्षेत्रातील आव्हानांबाबतही मोदींनी चर्चा केली. तसंच, त्यांनी काही खेळ खेळूनही पाहिले.चर्चेदरम्यान,



गेमर्सने सांगितलं की खेळादरम्यान त्यांचा एक गेमिंग कोड असतो. यावेळी मला लोकांनी आधीच नमो हे नाव दिलं असं मोदी उपहासात्मक म्हणाले. तसंच, या क्षेत्रासंबंधीत असलेले आव्हान त्यांना मेल द्वारे कळवण्याचंही आवाहन करण्यात आलं आहे.केवळ आशियाई खेळ आणि राष्ट्रकुल खेळच नाही तर, गेल्या वर्षी मुंबईतील आयओसी सत्रादरम्यान आयओसी प्रमुख थॉमस बाक यांनी जाहीर केल्यानुसार पुढील वर्षी ऑलिम्पिक एस्पोर्ट्स गेम्स अस्तित्वात आल्यावर ई-स्पोर्ट्सनाही आणखी वैधता मिळू शकणार आहे. ई-स्पोर्ट्सकडे पूर्वी करिअर म्हणून पाहिले जात नव्हते. व्यसन म्हणूनच याकडे पाहिले जायचं. काहीजणांनी ई-स्पोर्ट्सला जुगारही म्हटलं आहे. परंतु देशातील आघाडीच्या खेळाडूंनी पंतप्रधानांची भेट घेतल्याने आता या क्षेत्रालाही योग्य दिशा मिळण्याची शक्यता आहे.गेमिंग इन्फ्लुअन्सर्सची भेट घेतल्याचा व्हीडिओ प्रसिद्ध झाला आहे. गेमिंग क्षेत्रातील इन्फ्लुअन्सर्स आणि ई-स्पोर्ट्स एथलिट्सबरोबर मोदींनी गेमिंग क्षेत्राविषयी चर्चा केली. नमन माथुर, अनिमेश अग्रवाल, मिथिलेश पाटणकर, पायल धारे, अंशु बिष्ट, तीर्थ मेहता आणि गणेश गंगाधर या इन्फ्लुअन्सरसोबत मोदींनी चर्चा केली.

### गेमिंग क्षेत्राला मिळणार दिशा?

» या कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंतप्रधानांनी गेमिंग इन्फ्लुअन्सर्सबरोबर त्यांचा परिचय करून घेतला. या क्षेत्राला प्रोफेशनचा दर्जा दिला जावा का, त्यासाठी काय करता येईल, यावर या भेटीत चर्चा झाली. या क्षेत्रात तुम्ही दोन पद्धतीने तुमचं करिअर घडवू शकता, असं यावेळी इन्फ्लुअन्सर्सने मोदींना सांगितलं. या क्षेत्रात तुम्ही ई-स्पोर्ट्स बनू शकता किंवा गेमिंग कंटेट क्रिएटर म्हणून तुम्ही तुमची ओळख बनवू शकता, असंही त्यांनी पुढे स्पष्ट केलं. याशिवाय या क्षेत्रातील आव्हानांबाबतही मोदींनी चर्चा केली. तसंच, त्यांनी काही खेळ खेळूनही पाहिले.चर्चेदरम्यान, गेमर्सने सांगितलं की खेळादरम्यान त्यांचा एक गेमिंग कोड असतो. यावेळी मला लोकांनी आधीच नमो हे नाव दिलं असं मोदी उपहासात्मक म्हणाले. तसंच, या क्षेत्रासंबंधीत असलेले आव्हान त्यांना मेल द्वारे कळवण्याचंही आवाहन करण्यात आलं आहे.केवळ आशियाई खेळ आणि राष्ट्रकुल खेळच नाही तर, गेल्या वर्षी मुंबईतील आयओसी सत्रादरम्यान आयओसी प्रमुख थॉमस बाक यांनी जाहीर केल्यानुसार पुढील वर्षी ऑलिम्पिक एस्पोर्ट्स गेम्स अस्तित्वात आल्यावर ई-स्पोर्ट्सनाही आणखी वैधता मिळू शकणार आहे. ई-स्पोर्ट्सकडे पूर्वी करिअर म्हणून पाहिले जात नव्हते.

# मशिदीच्या आत 'मोदी है तो मुमकीन है'च्या घोषणा

## मोदींनी भाजपा 370 जागा जिंकेल असाही दावा केला

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभेची निवडणूक १९ तारखेपासून सात टप्प्यात होणार आहे. यासाठी प्रचार एकदम जोरदार सुरु आहे. भाजपा, एनडीएने ४०० पारचा नारा दिला आहे. तसंच मोदींनी भाजपा ३७० जागा जिंकेल असाही दावा केला आहे. लोकसभा निवडणूक भाजपने प्रतिष्ठेची केली आहे. देशभरात मिळून ४०० पारचं लक्ष्य भाजपाला गाठायचं आहे त्यानुसार प्रचार सुरु आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीने राज्यात आणि इंडिया आघाडीने देशात भाजपा विरोधात कंबर कसली आहे. आम्ही ३०० पेक्षा जास्त जागा जिंकू असा दावा संजय राऊत यांनी केला आहे. या सगळ्या वातावरणात एका मशिदीत अब की बार ४०० पार, हर हर मोदी, घर घर मोदी, मोदी है ते मुमकिन है या घोषणा देण्यात आल्या.**




हैदरी मशिदीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समर्थनार्थ मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करण्यात आली. त्याचप्रमाणे 'मोदी है तो मुमकिन है' या घोषणा सुद्धा देण्यात आल्या. बोहरा समाजाने मशिदीच्या आत पीएम मोदी यांचे पोस्टर दाखवले. भोपाळमधून भाजपा उमेदवार आलोक शर्मा यांच्या समर्थनार्थ बोहरा समाजाने पीएम मोदी यांच्यासाठी घोषणाबाजी केली. बोहरा समाजाच्या लोकांनी एकत्र येऊन 'अबकी बार ४०० पार'ची घोषणा सुद्धा दिली. आमिल जौहर अली यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं भरभरुन कौतुक केलं. पंतप्रधान मोदी आणि भाजपाला यश मिळावं म्हणून प्रार्थनाही केली. भाजपाला बहुतांश लोक मुस्लिम विरोधी मानतात. पण पीएम मोदी ४०० पारचं टार्गेट गाठण्यासाठी मुस्लिम समुदायाला सुद्धा आपल्याबरोबर जोडण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. यात बोहरा समुदाय आणि पसमांदा मुस्लिमांचा विश्वास संपादन करण्याची भाजपाची रणनीती आहे. टीव्ही ९ भारतवर्षने हे वृत्त दिलं आहे. दाऊदी बोहरा हा मुस्लिमांमधील आर्थिकदृष्ट्या सर्वात श्रीमंत समाज आहे. भाजपासाठी नेहमीच या समाजाची भूमिका अनुकूल राहिली आहे. पीएम नरेंद्र मोदी आणि बोहरा समाजामध्ये चांगलं नातं आहे असा संदेश देण्यात आला आहे. बोहरा समाजाच्या धार्मिक कार्यक्रमात सहभागी होणारे मोदी पहिले पंतप्रधान होते. या समुदायातील बहुतांश लोक व्यापारी आहेत. यांचा व्यावसायिक समाज पीएम मोदींना पाठिंबा देणारा समाज आहे.लोकसभेची निवडणूक १९ तारखेपासून सात टप्प्यात होणार आहे. यासाठी प्रचार एकदम जोरदार सुरु आहे. भाजपा, एनडीएने ४०० पारचा नारा दिला आहे. तसंच मोदींनी भाजपा ३७० जागा जिंकेल असाही दावा केला आहे. लोकसभा निवडणूक भाजपने प्रतिष्ठेची केली आहे. देशभरात मिळून ४०० पारचं लक्ष्य भाजपाला गाठायचं आहे त्यानुसार प्रचार सुरु आहे. दुसरीकडे आघाडीने राज्यात आणि इंडिया आघाडीने देशात भाजपा विरोधात कंबर कसली आहे.३०० पेक्षा जास्त जागा जिंकू असा दावा संजय राऊत यांनी केला आहे.

### अबकी बार 400 पार

» या सगळ्या वातावरणात एका मशिदीत अब की बार ४०० पार, हर हर मोदी, घर घर मोदी, मोदी है ते मुमकिन है या घोषणा देण्यात आल्या. अलीगंज हैदरी मशिदीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समर्थनार्थ मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करण्यात आली. त्याचप्रमाणे 'मोदी है तो मुमकिन है' या घोषणा सुद्धा देण्यात आल्या. बोहरा समाजाने मशिदीच्या आत पीएम मोदी यांचे पोस्टर दाखवले. भोपाळमधून भाजपा उमेदवार आलोक शर्मा यांच्या समर्थनार्थ बोहरा समाजाने पीएम मोदी यांच्यासाठी घोषणाबाजी केली. बोहरा समाजाच्या लोकांनी एकत्र येऊन 'अबकी बार ४०० पार'ची घोषणा सुद्धा दिली.


# अजिंक्य देव रणबीरच्या चित्रपटात झळकणार

मराठी सिनेसृष्टीतील एकेकाळचे देखणे अभिनेते म्हणजे अजिंक्य देव. अजिंक्य देव यांनी आपल्या दमदार अभिनयाने व जबरदस्त पर्सनालिटीने प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला. मराठीचं नव्हे तर त्यांनी हिंदी सिनेसृष्टीत आपलं वेगळं स्थान निर्माण केलं. लवकरच अभिनेते अजिंक्य देव रणबीर कपूरच्या बहुचर्चित, बहुप्रतीक्षित अशा एका चित्रपटामध्ये झळकणार आहेत. रणबीर कपूरचा आगामी चित्रपट 'रामायण'मध्ये अजिंक्य देव पाहायला मिळणार आहेत. नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' चित्रपटात प्रभू श्रीरामाच्या भूमिकेत रणबीर कपूर, सीतेच्या भूमिकेत दाक्षिणात्य अभिनेत्री साई पल्लवी आणि हनुमानाच्या भूमिकेत सनी देओल झळकणार आहे.
या चित्रपटात अजिंक्य देव महत्त्वपूर्ण भूमिकेत असणार आहेत.'महाराष्ट्र टाइम्स'शी बातचित करताना अजिंक्य देव म्हणाले, "मी या महत्त्वाकांक्षी चित्रपटाचा भाग आहे. एक खूप चांगली भूमिका माझ्या वाट्याला आली आहे.
सध्या आमची कार्यशाळा सुरू आहे. चित्रपटात प्रभू श्रीराम यांची व्यक्तिरेखा रणबीर कपूर साकारतोय. लवकरच त्याचं चित्रीकरण सुरू होईल आणि तेव्हा मी त्याबाबत नक्की सांगेन. सध्या यासंबंधित आवश्यक वाचन व अभ्यास सुरू आहे. त्याविषयीच्या सर्वच गोष्टींची सुरुवात आहे. त्यामुळे मी आता याबाबत फार बोलू शकणार नाही."'रामायण' चित्रपटात विश्वामित्र ही भूमिका साकारत आहात का? असं विचारल्यावर अजिंक्य देव म्हणाले, "आता यावर सविस्तर बोलणं थोडं अवघड आहे.

# पूजा हेगडेनं मुंबईत घेतलं नवं आलिशान घर

प्रत्येक कलाकाराचं स्वप्न असतं की मुंबईत स्वतःचं घर असावं. बाल्कनीतून समुद्र किनारा दिसावा. त्यामुळे बरेच कलाकार समुद्र किनारी घर घेताना दिसत आहेत. हाच ट्रेंड फॉलो करत अभिनेत्री पूजा हेगडेनं देखील समुद्र किनारी आलिशान घर घेतल्याचं समोर आलं आहे. पूजाच हे आलिशान घर कुठे आहे? किती किंमत आहे? जाणून घ्या... दाक्षिणात्य सिनेसृष्टीत ठसा उमटवल्यानंतर अभिनेत्री पूजा हेडगेनं हृतिक रोशनसह 'मोहनजोदडो' चित्रपटाच्या माध्यमातून हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केलं. खूप कमी वेळात पूजाने बॉलीवूडमध्ये आपलं स्थान निर्माण केलं. अशा या लोकप्रिय अभिनेत्रीनं मुंबईत स्वतःचं हक्काचं घर घेतलं आहे. इ-टाइम्सच्या वृत्तानुसार, पूजाने मुंबईतील वांद्रे येथे आलिशान घर घेतलं आहे. पूजाच्या आलिशान घरातून समुद्र दिसतो. तिचं नवं घर ४ हजार स्क्वेअर फूटचं असल्याचं म्हटलं जात आहे. पूजाच्या या आलिशान घराची किंमत तब्बल ४५ कोटी रुपये आहे. लवकरच पूजा या नव्या घरात शिफ्ट होणार आहे.दरम्यान, पूजाच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, सलमान खानच्या 'किसी का भाई किसी की जान' या चित्रपटानंतर ती सुपरस्टार शाहिद कपूरसह झळकणार आहे. क्राइम थ्रिलर 'देवा' चित्रपटात पूजा व शाहिद ही नवी जोडी पाहायला मिळणार आहे.

# बडे मियाँ छोटे मियाँच्या कमाईत घट



क्षय कुमार व टायगर श्रॉफ यांच्या मुख्य भूमिका असलेला चित्रपट 'बडे मियाँ छोटे मियाँ' ११ एप्रिल रोजी प्रदर्शित झाला. या चित्रपटाला पहिल्या दिवशी प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. गुरुवारी चित्रपटाने ग्रँड ओपनिंग करत बॉक्स ऑफिसवर चांगला गल्ला जमवला. त्यानंतर आता चित्रपटाच्या दुसऱ्या दिवसाच्या कमाईची आकडेवारी समोर आली आहे. अक्षय कुमार, टायगर श्रॉफ, अलाया एफ व मानुषी छिल्लर यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपटाने पहिल्या दिवशी दमदार सुरुवात केली. गुरुवारी 'बडे मियाँ छोटे मियाँ' ने १५.५० कोटींच्या व्यवसाय केला. इंडस्ट्री ट्रॅकर 'सॅकनिल्क'ने दिलेल्या माहितीनुसार या चित्रपटाच्या कमाईत दुसऱ्या दिवशी घसरण झाली आहे.बडे मियाँ छोटे मियाँ'ने दुसऱ्या दिवशी बॉक्स ऑफिसवर पहिल्या दिवसाच्या तुलनेत निम्मी कमाई केली. शुक्रवारी चित्रपटाने सात कोटी रुपये कमावले. चित्रपटाचे दोन दिवसांचे एकूण कलेक्शन २२.६५ कोटी रुपये झाले आहे. चित्रपटाची कमाई दुसऱ्या दिवशी घटली असली तरी शनिवार व रविवारी वीकेंड असल्याने चित्रपटाच्या कलेक्शनमध्ये वाढ होऊ शकते.अली अब्बास जफर लिखित आणि दिग्दर्शित 'बडे मियाँ छोटे मियाँ' हा एक ॲक्शन थ्रिलर चित्रपट आहे. यात दाक्षिणात्य स्टार पृथ्वीराज सुकुमारन व बिजय आनंद यांच्या नकारात्मक भूमिका आहेत. यामध्ये रोनित रॉय बोस आणि इतर अनेक कलाकार आहेत.

# काजोलच्या हिरोने सांगितला प्रसंग

अभिनेता कमल सदानाने ३२ वर्षांआधी १९९२ मध्ये काजोलबरोबर 'बेखुदी' चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण केलं होतं. काजोलचाही हा पहिला चित्रपट होता. कमलच्या आयुष्यात एक अशी घटना घडली होती, ज्यामुळे तो उद्ध्वस्त झाला. कमलने २० व्या वर्षी त्याचं कुटुंब गमावलं होतं. त्याच्या वडिलांनी त्याच्यासमोर त्याची बहीण व आईचा खून केला होता. इतकंच नाही तर त्यांनी कमलवरही गोळी झाडली होती, पण तो बचावला. मग त्याचे वडील ब्रिज सदाना यांनी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली होती. कमल सदानाने सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत त्याच्या आयुष्यातील हा दुर्दैवी प्रसंग सांगितला. "माझा २० वा वाढदिवस होता. त्या रात्री माझ्या डोळ्यासमोर माझे वडील ब्रिज सदाना यांनी माझी आई, बहीण आणि मला गोळ्या घातल्या. नंतर त्यांनी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. ही घटना घडली तेव्हा त्यांचे मित्र हरी आमच्याबरोबर होते आणि त्यांनाही हातात गोळी लागली होती. वडिलांनी आई व बहिणीवर गोळ्या झाडल्यानंतर मी पळत जाऊन शेजाऱ्यांना बोलावलं आणि त्यांना रुग्णालयात नेलं पण त्या दोघीही वाचू शकल्या नाहीत. दवाखान्यात जाईस्तोवर मलाही गोळी लागली याची मला कल्पना नव्हती. मला डॉक्टरांनी विचारलं की इतकं रक्त कुठून आलं तर मी म्हटलं की आई किंवा बहिणीचं असेल, मग डॉक्टरांनी सांगितलं की मलाही गोळी लागलीय. त्या रुग्णालयात जागा नसल्याने त्यांनी मला दुसरीकडे पाठवलं," असं कमल म्हणाला.माझ्या मानेच्या आरपार गोळी गेली होती. माझ्या आई व बहिणीचा मृत्यू झाला, बाबांनीही स्वतःला संपवलं. माझं कुटुंब माझ्या डोळ्यासमोर एका क्षणात संपलं. मलाही गोळी लागली होती.

# नेपोटिझमवर विद्या बालनचं स्पष्ट विधान



बॉलीवूडमध्ये स्वतःचं स्थान निर्माण करायला कलाकारांना प्रचंड मेहनत करावी लागते. त्यातही नवखा कलाकार असेल तर त्याला इथे काम मिळवण्यासाठी करावा लागणारा संघर्ष चुकत नाही. विद्या बालन आणि प्रतीक गांधी यांनी इंडियन एक्स्प्रेस 'एक्सप्रेसो' मालिकेच्या पहिल्या भागात हजेरी लावली. त्यांनी या मुलाखतीत अनेक प्रश्नांची उत्तरं दिली. इंडस्ट्रीत यशस्वी होण्याआधी कामासाठी पचवलेले नकार, ऐकावे लागलेले टोमणे याबद्दलही त्यांनी सांगितलं. सिनेसृष्टीतील नेपोटिझम हा कायम चर्चेत राहणारा विषय आहे. फिल्म इंडस्ट्रीमध्ये पक्षपातीपणा अनुभवयाला मिळाला का, असा प्रश्न विद्या बालनला विचारण्यात आला. "नेपोटिझम असो किंवा नसो, मी इथे आहे. इंडस्ट्री कोणाच्या बापाची नाही, तसं असतं तर आज प्रत्येक बापाचा मुलगा आणि प्रत्येक बापाची मुलगी यशस्वी असते (सर्व स्टार किड्स यशस्वी झाले असते)," असं स्पष्ट उत्तर विद्या बालनने दिलं.प्रतीकने त्याची इंडस्ट्रीतील सुरुवात ते यशापर्यंतचा त्याचा प्रवास सांगितला. सुरतहून मुंबईत आल्यानंतर त्याला खूप संघर्ष करावा लागला. "टीव्हीवर मला रिजेक्ट केलं गेलं. मी दिलेल्या सर्व ऑडिशन्समध्ये मला नकार मिळाला. त्या निर्मात्यांची टेलिव्हिजन शोसाठी अभिनेत्याची कल्पना थोडी वेगळी होती. मी त्यात फिट बसत नव्हतो. ते विशिष्ट शरीरयष्टीचे, विशिष्ट त्वचेचा रंग असलेले आणि एक विशिष्ट लूक असलेले अभिनेते शोधत होते," असं प्रतीक म्हणाला.बालनने तिच्या करिअरच्या सुरुवातीच्या काळात झालेल्या त्रासाबद्दल सांगितलं. "मी तीन वर्षे हार्टब्रेकमधून जात होते. सारखे नकार मिळत होते आणि त्यामुळे मला त्रास होता. मी अक्षरशः उद्ध्वस्त झाले होते आणि या क्षेत्रात पुढे जाण्याची माझी इच्छा होत नव्हती. पण माझ्या मनात काहीतरी करायची आग होती जी या सर्व नकारांपेक्षा मोठी होती," असं विद्या म्हणाली. विद्या आणि प्रतीक यांनी 'दो और दो प्यार' या चित्रपटात एकत्र काम केलं आहे. यात त्यांनी एका विवाहित जोडप्याची भूमिका केली आहे. यात इलियाना डिक्रूझ आणि सेंधील राममूर्ती यांच्याही भूमिका आहेत. चित्रपट १९ एप्रिलला प्रदर्शित होणार आहे.बॉलीवूडमध्ये स्वतःचं स्थान निर्माण करायला कलाकारांना प्रचंड मेहनत करावी लागते. त्यातही नवखा कलाकार असेल तर त्याला इथे काम मिळवण्यासाठी करावा लागणारा संघर्ष चुकत नाही. विद्या बालन आणि प्रतीक गांधी यांनी इंडियन एक्स्प्रेस 'एक्सप्रेसो' मालिकेच्या पहिल्या भागात हजेरी लावली. त्यांनी या मुलाखतीत अनेक प्रश्नांची उत्तरं दिली.

# राजस्थानचा पंजाबवर 3 विकेटसनी विजय

## राजस्थान रॉयल्सच्या शिमरॉन हेटमायरची निर्णायक खेळी

नवी दिल्ली ।
।वृत्तसंस्था

**आयपीएलच्या १७व्या हंगामातील २७ वा सामना पंजाब किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात मुल्लानपूर येथे खेळला गेला. या सामन्यात राजस्थान रॉयल्सने पंजाब किंग्जवर ३ विकेट्सनी निसटता विजय मिळवला. पंजाब किंग्जने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना ८ बाद १४७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात राजस्थान रॉयल्सने शिमरॉन हेटमायरच्या शानदार खेळीच्या जोरावर १९.५ षटकांत ७ गडी गमावून १५२ धावा करत पाचवा विजय नोंदवला.**





राजस्थान रॉयल्ससमोर विजयासाठी १४८ धावांचे लक्ष्य होते. संजू सॅमसनच्या नेतृत्वाखालील राजस्थान रॉयल्सने संथ सुरुवात करूनही १९.५ षटकांत ७ विकेट्स राखून लक्ष्य गाठले. राजस्थान रॉयल्सच्या विजयाचा हिरो ठरला शिमरॉन हेटमायर. या फलंदाजाने शेवटच्या षटकांमध्ये स्फोटक फलंदाजीचा नमुना सादर केला. शिमरॉन हेटमायर १० चेंडूत २७ धावा करून नाबाद परतला. या खेळीत त्याने १ चौकार आणि ३ षटकार मारले.राजस्थान रॉयल्ससाठी सलामीवीर यशस्वी जैस्वालने २८ चेंडूत सर्वाधिक ३९ धावा केल्या. तनुष कोटियनने ३१ चेंडूत २४ धावांचे योगदान दिले. या संघाचा कर्णधार संजू सॅमसनने १४ चेंडूत १८ धावा केल्या. तर ध्रुव जुरेल ११ चेंडूत ६ धावा करून हर्षल पटेलचा बळी ठरला. शेवटच्या षटकांमध्ये रोव्हमन पॉवेलने ५ चेंडूत ११ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. मात्र, शेवटच्या षटकात १० धावांची गरज असताना शिमरॉन हेटमायरने चौथ्या चेंडूवर षटकार मारुन राजस्थानला विजय मिळवून दिला. अशा प्रकारे राजस्थान रॉयल्सने मोसमातील पाचवा विजय नोंदवला. आता राजस्थान रॉयल्सचे ६ सामन्यांत १० गुण झाले आहेत. सध्या संजू सॅमसनचा संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. पंजाब किंग्जसाठी कागिसो रबाडा आणि सॅम करन हे सर्वात यशस्वी गोलंदाज ठरले. या दोन्ही गोलंदाजांनी २-२ विकेट घेतल्या. याशिवाय अर्शदीप सिंग, लियाम लिव्हिंगस्टोन आणि हर्षल पटेल यांना प्रत्येकी १ विकेट मिळाली. तत्पूर्वी नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या पंजाब संघाची सुरुवात विशेष झाली नाही. अथर्व तायडे आणि जॉनी बेअरस्टो यांच्यात पहिल्या विकेटसाठी २७ धावांची भागीदारी झाली. आवेश खानने चौथ्या षटकात अथर्वला बाद केले. या सामन्यात तो शिखर धवनच्या जागी खेळताना दिसला. संघाला दुसरा धक्का युजवेंद्र चहलने ४१ धावांवर दिला. स्टार स्पिनरने प्रभसिमरन सिंगला (१०) बाद केले. यानंतर केशव महाराजांनी जॉनी बेअरस्टोला बाद केले. आठव्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर त्याने पंजाबला तिसरा धक्का दिला. बेअरस्टो १५ धावा करून परतला.सॅम करनने पाच आणि शशांक सिंगने नऊ धावा केल्या. चांगल्या फॉर्मात दिसणाऱ्या जितेश शर्माला आवेश खानने पॅव्हेलियनमध्ये पाठवले. त्याला एक चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने २९ धावा करता आल्या. यानंतर लियाम लिव्हिंगस्टोन २१ धावा करून परतला. त्याला संजू सॅमसनने धावबाद केले. आशुतोष शर्मा डेथ ओव्हर्समध्ये पंजाबसाठी तारणहार ठरला.

### हेटमायरने विजयी षटकार मारला

१ त्याने अवघ्या १६ चेंडूत ३१ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याने १९३.७५ च्या स्ट्राइक रेटने एक चौकार आणि तीन षटकार मारले. शेवटच्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर ट्रेंट बोल्टने त्याला केशव महाराजकरवी झेलबाद केले.आयपीएलच्या १७व्या हंगामातील २७ वा सामना पंजाब किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात मुल्लानपूर येथे खेळला गेला. या सामन्यात राजस्थान रॉयल्सने पंजाब किंग्जवर ३ विकेट्सनी निसटता विजय मिळवला. पंजाब किंग्जने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना ८ बाद १४७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात राजस्थान रॉयल्सने शिमरॉन हेटमायरच्या शानदार खेळीच्या जोरावर १९.५ षटकांत ७ गडी गमावून १५२ धावा करत पाचवा विजय नोंदवला.

# दीपेंद्र सिंग ऐरीचे ६ चेंडूवर सलग ६ षटकार

## नेपाळच्या फलंदाजाने कतारच्या गोलंदाजाला फोडला घाम

नवी दिल्ली ।
।वृत्तसंस्था

**नेपाळचा फलंदाज दीपेंद्र सिंग ऐरी याने शनिवारी (१३ एप्रिल) जागतिक क्रिकेटमध्ये खळबळ उडवून दिली. त्याने कतार विरुद्ध एसीसी पुरुष टी-२० इंटरनॅशनल प्रीमियर लीग कपमध्ये बॅटने कहर केला आहे. दीपेंद्रने ६ चेंडूत ६ षटकार मारण्याचा विक्रम केला. आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये ही कामगिरी करणारा तो जगातील तिसरा फलंदाज ठरला आहे. त्याच्या आधी भारताचा युवराज सिंग आणि वेस्ट इंडिजचा किरॉन पोलार्ड यांनी ही कामगिरी केली होती.**



या सामन्यात नेपाळ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यांनी २० षटकात ७ गडी बाद २१० धावा केल्या. या संघासाठी दीपेंद्र सिंगने २१ चेंडूत ६४ धावा केल्यानंतर नाबाद राहिला. त्याने आपल्या स्फोटक खेळीत ३ चौकार आणि ७ षटकार मारले. दीपेंद्रने ३०४.७६ च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या. त्यांच्याशिवाय यष्टीरक्षक फलंदाज आसिफ शेखने ४१ चेंडूत ५२ धावा आणि कुशल मल्लाने १८ चेंडूत ३५ धावा केल्या.नेपाळच्या डावातील शेवटच्या षटकात दीपेंद्रने कामरान खानची धुलाई केली. त्याने कतारचा गोलंदाज कामरानच्या सर्व सहा चेंडूंवर षटकार ठोकले. दीपेंद्रच्या आधी युवराज सिंग आणि किरॉन पोलार्ड यांनी टी-२० इंटरनॅशनलमध्ये सहा चेंडूत सहा षटकार मारले होते. युवराजने २००७ टी-२० वर्ल्ड कपमध्ये स्टुअर्ट ब्रॉडच्या षटकात इंग्लंडविरुद्ध सहा षटकार मारले होते. त्याचवेळी, पोलार्डने २०२१ मध्ये अकिला धनंजयच्या चेंडूवर श्रीलंकेविरुद्ध ही कामगिरी केली होती.दीपेंद्रच्या नावावर टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद अर्धशतक करण्याचा विक्रम आहे. गेल्या वर्षी आशियाई क्रीडा स्पर्धेदरम्यान मंगोलियाविरुद्ध हँगझोऊ येथे त्याने ९ चेंडूत अर्धशतक झळकावले होते. दीपेंद्र ३०० पेक्षा जास्त स्ट्राइक रेटसह टी-२० क्रिकेटमध्ये दोनदा अर्धशतक करणारा पहिला फलंदाज ठरला. त्याने मंगोलियाविरुद्ध १० चेंडूत नाबाद ५२ धावा केल्या होत्या.या सामन्यात नेपाळ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यांनी २० षटकात ७ गडी बाद २१० धावा केल्या. या संघासाठी दीपेंद्र सिंगने २१ चेंडूत ६४ धावा केल्यानंतर नाबाद राहिला. त्याने आपल्या स्फोटक खेळीत ३ चौकार आणि ७ षटकार मारले. दीपेंद्रने ३०४.७६ च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या.

### सहा चेंडूंवर षटकार ठोकले

मल्लाने १८ चेंडूत ३५ धावा केल्या.नेपाळच्या डावातील शेवटच्या षटकात दीपेंद्रने कामरान खानची धुलाई केली. त्याने कतारचा गोलंदाज कामरानच्या सर्व सहा चेंडूंवर षटकार ठोकले. दीपेंद्रच्या आधी युवराज सिंग आणि किरॉन पोलार्ड यांनी टी-२० इंटरनॅशनलमध्ये सहा चेंडूत सहा षटकार मारले होते. युवराजने २००७ टी-२० वर्ल्ड कपमध्ये स्टुअर्ट ब्रॉडच्या षटकात इंग्लंडविरुद्ध सहा षटकार मारले होते.